Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0020

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# आदिवासी समाज आणि साहित्य

**संशोधक विद्यार्थी**
**कु डवरे संजीवनी शिवाजी**
एम ए मराठी,नेट,बि एड,CTET
स्वा. रा. ती. म.विद्यापीठ, नांदेड
मोबाईल क्रमांक : 9922902807

**संशोधन मार्गदर्शक**
**डॉ. सोळंके नवीन केशवराव**
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औंढा नागनाथ, हिंगोली

**सारांश**

आदिवासी समाज आणि साहित्याचा अभ्यास करीत असताना ,सर्वसाधारणपणे आपल्या असे निदर्शनास येते की, जवळजवळ १९६० नंतर साहित्य लिखाणाच्या स्वरूपात फार मोठ्या प्रमाणात आकस्मिक उलथापालट झाली.आणि त्याचाच परिणाम म्हणून साहित्य क्षेत्रात अनेक नवनवीन साहित्य प्रवाह निर्माण झाली. तसे आदिवासी साहित्याचा एक विशिष्ट दृष्टिकोनातून अभ्यास करताना, असे निदर्शनास येते की, आदिवासी समाजाचे दुःख, व आदिवासी समाजाची सामाजिक स्थिती, वास्तव्य ,अत्यंत मागासलेले असल्या कारणास्तव आदिवासी समाज दऱ्याखोरांनी, रानोमाळ, डोंगरात, जंगलात, बेटांवर ,राणा- वनात, वाडीखेडीन, अलिप्त राहणारा समाज आहे. आणि हा समुदाय जंगलात राहत असल्याकारणाने या समाजाची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, प्रगती ज्या प्रमाणात व्हायला हवी होती त्या प्रमाणात न झाल्या कारणास्तव या समाजाला मागासलेला, पिछाडलेला, आदिम समाज अशी ओळख निर्माण झाली आहे.

**मुख्य शब्द -** आदिवासी समाज, साहित्य.

तसे इतर समाज आणि आदिवासी समाज यांच्या प्रगतीमध्ये अत्यंत मोठी तफावत असल्याचीआजही निदर्शनास येते. अशिक्षित पणा, अंधश्रद्धा, अज्ञान, अशा कारणामुळे आदिवासी समाजाचे साहित्य अत्यंत प्राचीन, प्रगल्भ व सर्वोत्कृष्ट असले तरी, या साहित्याचे स्वरूप लिखित स्वरूपात नसल्या कारणास्तव या साहित्याला हवी तशी प्रसिध्दी आणि प्रसार झालेला दिसून येत नाही. अगदी आदिवासींच्या साहित्यांच्या बाबतीत जर असे म्हटले की, आदिवासी साहित्य हे आजही बेदखलपात्रच राहिले तर त्यात काही चुकीचे किंवा वावगे ठरणार नाही. कारण आदिवासींच्या दुःखाचा स्वर, त्यांच्या अस्मिता, त्यांच्या स्वत्वाची जाणीव ,सर्वात अगोदर जर कुठल्या व्यक्तीने यथार्थ मांडण्याचा प्रयत्न केला असेल, तर ती व्यक्ती म्हणजे राष्ट्रपिता ज्योतिबा फुले होय. महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्या "अखंडा आधि काव्य"या ग्रथरचनेमध्ये म्हटले आहे,की" गोंड भिल्ल क्षेत्री होते मुळधनी, इराणी मागोणी आले येथे, शूर भिल्ल काळी शहरांनी तोडिले ,हाकलून दिले राणोवनी " गोंड भिल्ल हे जे काही आदिवासी समाजातीलच काही जमाती होत्या, त्या एका काळी येथील मूळ धनी, मूळ क्षेत्रीय होत्या,तसेच जंगल, जल ,जमिनीचा राजा होता. परंतु इराणी मागून आले, इराणी म्हणजेच "आर्य" मागून आले व त्यांनी शूर वीर आदिवासींना, गोंड भिल्ल कोळी जमातीच्या लोकांना, शरांनी म्हणजेच शस्त्रांनी तोडिले. आणि रानावनात दूर दूरवर हाकलुनी दिले. व तेही भितीपोटी आपल्या संरक्षणार्थ दूर दूर निघून गेले. ते आजतागायत आदिवासी समाज इतर समाज्यांपासून अलिप्त, राणावनातच निसर्गाच्या सानिध्यात आपलं वास्तव्य करीत आहे. आणि म्हणूनच असं म्हटले जाते की आदिवासी समाजातील लोक ही," घाबरत नाहीत सापाला, भित नाहीत वाघाला,भीतात ती फक्त पांढरपेशा लोकांना."

**१)प्रस्तावना**

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0020
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

**आदिवासी समाजाचा व साहित्य अभ्यास करीत असताना, आपल्याला अगोदर आदिवासी म्हणजे कोण,?किंवा आदिवासी कोणाला म्हणावे,? आदिवासींची पूर्वपिटिका, आदिवासी समाजाची सांस्कृति, आदिवासींची व्याख्या, आदिवासींची सज्ञा, व ह्या संकल्पना.आणि साहित्य म्हणजे काय? साहित्या ची व्याख्या, व संकलप्ना,साहित्यांचे स्वरूप, साहित्याचे मुख्य प्रकार, आदिवासीं साहित्य, आदिवासीं साहित्याची मुलभूत वैशिष्ट्ये. पाहणे देखील अनिवार्य ठरतात.**

**२)आदिवासी म्हणजे कोण?**

**आदिवासी समाजाचा संदर्भात अभ्यास करीत असताना आपल्याला असे निदर्शनास येते की, भारताला स्वातंत्र्य मिळून जरी अनेक वर्ष झाली असेल व, देशात मात्र सर्वच बाबती नेत्रदीपक उन्नती दिसून येत असेल, पण या प्रगतीमुळे देशाचा आर्थिक सामाजिक आणि पारंपारिक दृष्टीने कितीही विकास पहावयास मिळत असला, तरी या सर्व विकासाच्या विचार केला असता ही सर्व प्रगती/ उन्नती, यापासून सर्वदूर असणारा, डोंगराळ भागात, दुर्गम ठिकाणी, जंगलात, दर्या खोऱ्यात, बेटांवर वसलेला,अलिप्त राहणारा समाज म्हणजे आदिवासी समाज होय.**

**३) आदिवासी समाजाची व्याख्या**

अनेक शास्त्रज्ञांनी , संशोधकांनी व अभ्यासकांनी आदिवासी ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी अनेक व्याख्याच् साहाय्या घेऊन विशद करण्याचा प्रयत्न केल्याचा आपल्याला सर्वसामान्यपणे ज्ञात आहे.त्यातील काही अभ्यासकांच्या व्याख्या पुढील प्रमाणे.

**१) डब्ल्यू चे पेरी**

डब्ल्यू जे पेरी यांनी आपल्या व्याख्येत, आदिवासी समाजाची कमीत कमी वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. ते म्हणतात, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भुप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज किंवा आदिवासी असे म्हणतात .

**२) डी एन मुजुमदार**

डी एन मुजुमदार म्हणतात. समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंबसमूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.

**३) गेलीन व गेलीन**

गेलीन व गेलीन यांच्या मते एका विशिष्ट भुप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.

४) इसवी सन १९६२ साली **शिलॉंग मध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या** केली आहे ती व्याख्या पुढीलप्रमाणे आहे एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पुर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रिती रिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एक जिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात.

**५) प्राध्यापक माधव सरकुंडे**

प्राध्यापक माधव सरकुंडे यांनी आदिवासींच्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांचा विचार करून विस्तृत व्याख्या केली आहे. अभेद सामाजिक ऐक्य, प्रगल्भ अनुभवजन्य तंत्रज्ञान, दुर्मिळ औषधीचे ज्ञान, नैतिकदृष्ट्या अत्यंत पवित्र, व्यवहारिक व्यवहारातील प्रामाणिकपणा, इत्यादी वैशिष्ट्य असणारा सलग देशात वास करणारा, विशिष्ट बोली मानणारा, गण परंतु हिंदूपेक्षा पूर्णपणे वेगळा समाज, समूह, म्हणजे आदिवासी समाज होय.

**६) झिपेरियल गॅझेट**

https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0020
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

झिपेरियल गॅझेट मध्ये आदिवासींची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे. समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भुभागात राहणाऱ्या, सुरुवातीला आंतरपीवाही असण्याची शक्यता असलेला, पण सर्वसामान्यपणे अंतर विवाह नसलेल्या व समान नाव धारणा करणाऱ्या, कुटुंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.

वरील अनेक व्याख्यान भरून आपल्याला आदिवासी समाजाची विविध लक्षणे, वैशिष्ट्य, बोलीभाषा, जीवन पद्धती एकजिनासिपणा, बोलीभाषा व संस्कृती असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण व अत्यंत प्राचीन असल्याची सर्वसामान्यपणे निदर्शनास येते

**४) आदिवासींची सज्ञा**

काही अभ्यासकांनी व शास्त्रज्ञांनी आदिवासी ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी काही विशिष्ट संज्ञांचा वापर केला आहे त्या पुढील प्रमाणे

.

१) मूळनिवासी: आदिवासींचे कैवारी व पूज्य ठक्कर बाप्पा व महात्मा गांधीजींनी व्यक्त केलेली सज्ञा .

२) धरतीची लेकरे: सहानुभूतीने व्यक्त केलेली सज्ञा.

३) जंगलाचे अनभिशक्त राजे .

४) गिरीजन:गिरीकिंदरात शेकडो वर्ष वास्तव्य केल्यामुळे , आदिपूत्र किंवा वनपुत्र किंवा गिरीजन अशा स्वज्ञा करण्यातआलीआहे.

४) आदिम: डॉ.भाऊ मांडवकर डॉ.गोविंद गारे यांनी वन्य जमातीसाठी वापरलेला शब्द.

५) अरण्यक: उपहासाने लंगोट्ये.

६) वनवासी: अर्धं नग्न राहून, लंगोटी नेसून, शिकार करण्यासाठी, रानोवन वन भटकल्यामुळे वनवासी, किंवा वन्य जमाती, म्हणूनही सज्ञा दिली गेली आहे .

७) अनुसूचित जमाती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत म्हटले आहे.

**५) आदिवासी समाजाची स्थिती.**

आदिवासी समाजाला देशाचे खरे मालक, मूळनिवासी, धरतीची लेकर, जंगलाचे अनअभिष्यक्त राजे, आदिम, गिरीजन, अनुसूचित जमाती. अशा अनेक संज्ञांनी संबोधले गेले असले, तरी या आदिवासी समाजाची सामाजिक स्थिती पाहता, मोठ्या प्रमाणात गरीबी, दारिद्र्य ,अज्ञान, हे या समाजाच्या वाट्याला आलेले दिसून येते. तसेच या आदिवासी समाजाचा विकासाच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला असता, आदिवासी समाजाचा विकास हा, शैक्षणिक विकास, आर्थिक विकास, सामाजिक विकास, यांचे कमीप्रमाण अत्यल्प आहे.या समाजाला मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा व अज्ञान आणि व्यसनाधीनतेची कीड लागलेली आहे. यामुळे आदिवासी समाजाची गरिबी, दारिद्र्य, अज्ञानाने पोखरला गेला व या परिस्थितीत राहून हा समाज अत्यंत उदासीन तिकडे झुकला गेला आहे. म्हणूनच या समाजात अत्याधुनिक तंत्रज्ञान विकास नवनवीन संकल्पना या सर्वांपासून वंचित व कोसो दूर राहिला आहे. आदिवासी समाजाचा विकासाच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला असता आजही आदिवासी समाज व ईतर सर्व समाज यांच्यात फार मोठी तफावत असल्याची आपल्या जानिव होते.

**६)साहित्य संकल्पणा**

साहित्य संकल्पना अभ्यासताना, आपल्याला असे निदर्शनास येते की,साहित्याचा उगम किंवा साहित्याची निर्मिती ही विशिष्ट संकल्पना बद्दल स्थलकालबद्ध व सामाजिक सांस्कृतिक तसेच वांग्मयीन अशा परिस्थितीत होत असल्या कारणास्तव साहित्य हे समाज आणि संस्कृती यांच्या संयुक्त संघमानेच निर्माण होत असते.

अगदीच कुठलंही साहित्य पाहिलं तर ते साहित्या आपल्याला त्या समाजाची सामाजिक स्थिती, सांस्कृतिक स्थिती, गती व वाटचाल आणि विशिष्ट अशी वास्तविक विचार प्रणाली, मूल्य, व्यवस्था प्रस्थापित करीत असते. आणि म्हणूनच असे म्हटले जाते की, साहित्य

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0020

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

हे प्रत्यक्ष वाचक आणि समाजामनावर जणू काही संस्कार करणारे, व कलात्मक परिणाम,सौंदर्यात्मक आणि वांग्मयीन सामाजिक व सांस्कृतिक साहित्याची निर्मितीमागील जडणघडणीमध्ये, प्रत्यक्ष स्वरूपात सहभागी होत असलेल नातं साहित्य आणि समाज हे परस्पर संबंधित असल्याकारणाने साहित्याच्या समाजावर व समाजाच्या साहित्यावर परिणाम हा होतच असतो.

**७)साहित्य म्हणजे काय?**

साहित्य म्हणजे काय किंवा साहित्य कशाला म्हणावं ही संकल्पना स्पष्ट करत असताना , साहित्य म्हणजे जणूकाही समाजाचे प्रतिबिंब दर्शविणारा आरसाच असतो .आपल्याला जर कुठल्याही समाजाचा व सामाजिक स्थितीचा अभ्यास करावयाचा असेल तर, तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, ज्वलंत परिस्थिती ही साहित्य स्वरूपात अवतरल्याचे व उपलब्ध असल्याचे प्रचिती कोणत्याही समाजाची आचारसरणी, विचारसरणी ,व्यवहार, संस्कृती ,सभ्यता, राजकीय आणि शैक्षणिक परिस्थिती, आपल्याला साहित्य स्वरूपात संकलित केली गेल्याचे प्रचिती येते .आणि म्हणूनच साहित्य हे समाज निर्मितीत अत्यंत मोलाची भूमिका बजावत असते, तसेच मूलभूत भर घालित असते व सतत नवनवीन साहित्य स्वरूपात सांस्कृतिक बदलाचे नवनवीन योगदान साहित्यमार्फत करीत असते .

दैनंदिन जीवनात आपण "साहित्य" या शब्दाचा सर्वसाधारणपणे अर्थ, हा सामायन, सामग्री किंवा विविध निरनिराळ्या अनेक वस्तू, अशा अर्थाने सर्रास घेत असतो .आणि म्हणूनच साहित्य या शब्दाचा शब्दप्रयोग आपल्यासमोर सहजगत्या अनेक सामग्री उभ्या राहत असतात.पण भाषिक अभ्यासाच्या दृष्टिकोनातून साहित्य हा शब्दप्रयोग एका विशिष्ट अर्थाने केला जात असतो. साहित्यालाच "लेखन" असेही म्हणता येईल, किंवा साहित्य म्हणजे वांग्मय असे म्हटले जात असल्याचे आपल्या प्रामुख्याने निदर्शनास येते

एकंदरीतच सांगावयाचे झाले तर, जे ,जे वाणीमय ते, ते वांग्मय. आणि जे ,जे ,लिखित तेते साहित्य असे असले तरी. या सज्ञा अगदीच सर्रास व सरसकट सर्वांना लागू पडत नाही. उदाहरणादाखल: जन्म कुंडली, गणिताचे पुस्तक, पंचांग यांना आपल्याला साहित्य असे म्हणता येणार नाही. पण ,जर आपण लघुकथा, कथा ,कादंबरी, नाटक ,कविता, आत्मकथन ही पुस्तक अभ्यासली तर या सर्व गोष्टींचा समावेश साहित्य स्वरूपात होत असल्याचे आपल्या निदर्शनास येते .

**८)साहित्याची व्याख्या.**

हडसन:

साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमातून केलेली जीवनाची मूलभूत अभिव्यक्ती होय .

वा .ल. कुलकर्णी :

कल्पनेच्या साह्याने एक व्यक्ती मनाने साधलेली अलौकिक अनुभव सृष्टीची निर्मिती म्हणजे साहित्य होय.

**९)साहित्याची मुख्य प्रकार**

कथा: -कथा, नवकथा, लघुकथा ,दीर्घकथा, गोष्टी, गुंज गोष्टी, दंतकथा, पौराणिक कथा. ई.

कविता: -कविता, ओव्या, अभंग, सुमित, चारोळी, ढवळे ,गझल, भारुडे, दीर्घ काव्य, महाकाव्य, आस्थाकाव्य, खंड काव्य, भावकविता, हाय को कटाव, लावणी, कथाकाव्य, पोवाडा, मुक्तछंदात्मक काव्य, पदे, पाळणे, गवळणी, विराण्या, आरत्या, भुपाळ्या ई.

नाटक :-नाटकांमध्ये पथनाट्य, एकांकिका, नाट्यछटा .

कादंबरी:- कादंबरी मध्ये लघु कादंबरी, कादंबरी का .

चरित्र:- चरित्रामध्ये आत्मचरित्र ,आत्मकथा स्व कथन .

ललित गद्य :-ललित गद्य मध्ये आठवणी, प्रवासवर्णने ,व्यक्ती चित्रे ,लघु निबंध, वैचारिक निबंध, निबंध.

**१०)नवसाहित्य प्रकार**

1960 मध्ये नवीन उदयाला आलेली साहित्यप्रकार पुढील प्रमाणे दलित साहित्य ग्रामीण साहित्य आदिवासी साहित्य स्त्रीवादी साहित्य ही आहेत.

**११)आदिवासीं साहित्य स्वरूप.**

आदिवासी साहित्याचा अभ्यास करीत असताना साधारणपणे आपल्या असे निदर्शनास येते की, जवळजवळ 1960 नंतर साहित्य लिखाणाच्या स्वरूपात फार मोठ्या प्रमाणात आकस्मिक अशी उलतापालत झाली असल्याने प्रामुख्याने, याचा परिणाम म्हणून नवसाहित्याची निर्मिती .व उदय झाला व त्यातचआदिवासी साहित्यांची निर्मिती झाली.

आदिवासी साहित्याचा नवार्थ अशा साहित्य लेखकांशी आहे की. ज्यात आदिवासी समाजाचे परिस्थिती संस्कृती सामाजिक स्थिती या सर्वांचं सर्व समावेशक असे जीवनचित्रनाचे अगदी व्यवस्थित सर्वसामावेशकपणे संकलन करून साहित्याच्या माध्यमातून दर्शवण्याचा प्रयत्न करण्याचा अट्टाहास म्हणजेच आदिवासी साहित्य होय .

आदिवासी समाजाच्या अनेक समस्या, त्या समस्या निराकरनासाठी सुरू असलेल्या संघर्ष, व अशा परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या साहित्य चा सर्व घटनानुक्रमाचा एक अनुबंधच आहे.ज्यात जल ,जमीन, जंगल ,यांच्याशी पूर्णतः पूर्वपारपासून जोडला गेलेला आदिवासी समाज, मागासलेपणा, त्यांचे दुःख, गरीबी, दारिद्र्य, त्रास, यातून होणाऱ्या वेदना. व त्याचबरोबर आदिवासी समाजाचे स्वतःच्या अस्तित्वाचा, आणि स्त्वाचा, अस्मितेचा, संरक्षणार्थ चाललेला आजतागायतच्या परिस्थितीचे मार्मिक दर्शन, आपल्याला आदिवासींच्या साहित्य स्वरूपातून व्यक्त होत असल्याचे निदर्शनास येते.

एकंदरीतच आदिवासी साहित्य म्हणजे, आदिवासी समाजाच्या, लोककथा आणि मौखिक कथा व कविता यांचाही समावेश होय.

तसे पाहता प्रत्येक देशात समृद्धी आशी साहित्य आहेत. आणि भारतात देखील आदिवासी साहित्य आहे. परंतु भारतात उपलब्ध असणारे आदिवासी साहित्य हे प्रमुखतः दोन स्वरूपात आहे. ते म्हणजे मौखिक आणि आधुनिक लिखित साहित्य स्वरूपातउपलब्ध आहे.

आदिवासी समाज हा अज्ञानी व अशिक्षित अडाणी असल्या कारणास्तव, आदिवासी साहित्य हे कितीही सर्वगुणसंपन्न असले तरी आदिवासी साहित्यातील भाषिक विविधता व नावीन्य, कुतूहल, जिज्ञासा, कथा, कविता, पोवाडे, नाटके, लोककथा, लोकगीते, असे सर्व साहित्य स्वरूप मौखिक स्वरूपातच उपलब्ध आहे. अधिवासांचे साहित्य लिखित स्वरूपात अत्यंत क्वचितच व कमी प्रमाणात असल्याचे निदर्शनास येते.

आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये सांगत असताना आदिवासी साहित्याची विशेषता ही सर्वसामान्यपणे निसर्गकेंद्री, मनुष्यकेंद्र, असल्याचे निदर्शनास येते. आदिवासींची भाषा,आदिवासींची संस्कृती, त्यांचे साहित्य व वेगळेपणा, भावभावना, वर्तन, विचार, अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण व उत्स्फूर्त प्रेरणादायी असल्याचे अनुभवयास मिळते. आदिवासी साहित्यरस व रूप ,गंध, ध्वनी, अत्यंत आविष्कारिक रित्या शब्द स्वरूपात, साहित्यमार्फत साकारित होऊन, जणू अभिव्यक्त होत आहे. व ही साहित्य अत्यंत आत्मीयता व्यक्त करून.सण, उत्सव, आचार, विचार, रूढी, परंपरा ,चालीरीती, संस्कृती, अत्यंत पुरातन असलेले तत्वज्ञान, कला व अविष्कार अशा सर्व गुणांनी गुणसंपन्न व वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी साहित्य असल्याचे आपल्या प्रथमदर्शनी लक्षात येते.

**१२)संदर्भ सूची.**

धाडे तुकाराम आदिवासींच्या धार्मिक अस्मितेचा उदय सेवा संजय लोहकरे यशोदीप क्रिएशन्स पुणे प्रथम आवृत्ती 30 ऑक्टोबर 2011.

तुकाराम विनायक वाचव्या" पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाचा( पालघर )वृत्तांत" हाकारा जानेवारी- जून 1919.
रोंगटे तुकाराम "आदिवासी कवितेतून जागतिकीकरणाच चित्रण" हाकार ऑक्टोबर-डिसेंबर 2014.
प्रा. डॉ. विनायक तुमराम "आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन".स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम संस्कारण 2012.
डॉ.प्रमोद मुनघाटे "आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या". प्रतिमा प्रकाशन पुणे संस्करण 2007.
डॉ.जाधव "आदिवासी साहित्य" सुलभा प्रकाशन प्रतापगड ,औरंगाबाद. 13 सप्टेंबर.
"आंध आदिवासी जमात: इतिहास व सांस्कृतिक वारसा". विश्वनाथ धुमाळे, सुवर्ण प्रकाशन 154 /3 पोळके बिल्डिंग ,दुसरा मजला ,शेवटचा बस स्टॉप, धायरी गाव पुणे 41.
" मराठवाड्यातील आंध  जमातीचे लोकसाहित्य"प्रा. डॉ. राजेश धनजकर, अनुराधा पब्लिकेशन नांदेड.